

मराठवाडा
मराठवाड्यातील आर्य समाजाच्या हालचालींची कांही केंद्रे
जळगाव
बुलढाणा
अकोला
यवतमाळ
आदिलाबाद
निजामाबाद
बिदर
सोलापूर
अहमदनगर
नाशीक
औरंगाबाद
जालना
हिंगोली
परभणी
नांदेड
उमरी
बीड
धारूर
परळी
केज
अंबेजोगाई
अहमदपूर
कळंब
लातूर
उदगीर
निलंगा
उस्मानाबाद
तुळजापूर
उ
● = केंद्र

# निवेदन

मी या निवेदनाद्वारे जाहीर करतो की, "Arya Samaj Movement In Marathwada " हा प्रबंध माझे संशोधन मार्गदर्शक डॉ. अरूण भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वत: लिहिला असून सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विषयातील एम्.फिल्. पदवीसाठी विद्यापीठास सादर केला आहे.

(नामदेव ज्ञानू कदम)
अभ्यासक

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : 29/12/1988

# प्रमाणपत्र

श्री. नामदेव ज्ञानू कदम यांनी इतिहास विषयाचील एम्.फिल्. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांजकडे सादर करावयाचा "Arya Samaj Movement In Marathwada" हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. श्री. कदम यांनी लिहिलेला प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनावर आधारित आहे.

( डॉ. अरुण भोसले )
संशोधन मार्गदर्शक
प्रपाठक,
इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : 29/12/1988

# प्र_स्ता_व_ना

आधुनिक भारताच्या इतिहासात १९ वे शतक हे सामाजिक सुधारणांचे शतक म्हणून ओळखले जाते. इंग्रजी शिक्षणाने भारतीयांना जीवनविषयक नवी दृष्टी लाभली आणि सामाजिक बदलाना चालना दिली. सुशिक्षित भारतीय तरूणांना हिंदू समाज जीवनातील दोष, उणीवा यांची जाणीव झाली. हिंदू समाज जीवनात कित्येक शतके चालत आलेले दोष नाहीसे करून नव हिंदु समाज निर्मितीसाठी देशाच्या विविध भागात धार्मिक संप्रदाय स्थापन होऊ लागले. त्यांनी धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या प्रश्नांना हात घातला. राजा राममोहन रॉय यानी बंगालमध्ये स्थापन केलेला ब्राम्होसमाज अखिल भारतातील सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळींची गंगोत्री होता. ब्राम्होसमाजापासून प्रेरणा घेऊन भारताच्या वेगवेगळया भागात विविध सुधारणा संप्रदाय निर्माण झाले. पंजाब, राजस्थान, गुजरात व उत्तरेकडील अन्य हिंदी भाषिक प्रदेशात धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळ महर्षि दयानंद सरस्वतींनी स्थापलेल्या आर्य समाजाने जोमाने चालवली,

स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदुस्थानमध्ये शेकडो संस्थाने अस्तित्वात होती त्यामुळे हिंदुस्थानचे ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानिक हिंदुस्थान अशा दोन प्रकारात विभागणी झाली होती. अशा संस्थानांमध्ये जी काही मातब्बर व मोठी संस्थाने होती त्यामध्ये दक्षिणेच्या प्रांतातील हैद्राबाद हे संस्थान होते. हैद्राबाद हे निजामाच्या वर्चस्वाखाली असणारे मोठे वैशिष्टयपूर्ण संस्थान होते. तेथे राज्यकर्ता मुस्लीम व बहुसंख्य प्रजाजन हिंदू अशी अवस्था होती. भौगोलिक व ऐतिहासिक दृष्टीनेही त्याचे स्थान आगळे, वेगळे होते. हिंदुस्थानच्या मध्यभागी असलेल्या या संस्थानास चोहोबाजूनी संरक्षणात्मक फळी होती. कधी दिल्लीच्या मोंगल बादशहांनी तर कधी मराठयांशी दोन हात करून, प्रसंगी मुत्सद्दीपणा दाखवून निजाम तेथे आपले स्थान टिकवून होता. त्याने ब्रिटिश सत्ताधीशांशी मिळते जुळते घेऊन आपले अस्तित्व टिकवून धरले होते.

हैद्राबाद राज्यामध्ये बहुसंख्यांक प्रजा हिंदू होती तर राजा म्हणजेच निजाम हा मुस्लीम होता. अशा अल्पसंख्यांकाकडून तेथे राहणाऱ्या हिंदू बहुसंख्यांकांवर अत्याचार, अन्याय होत होता. तेव्हा त्याला प्रतिकार करण्यासाठी अनेक संघटना पुढे सरसावल्या. मीर उस्मान अली खाँ (इ.स. १९११ ते १९४८ या शेवटच्या निजामाच्या कारकिर्दीतच हिंदूंच्या हक्कावर अतिक्रमण होऊन त्यांची सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक इ.जीवनाच्या सर्वच क्षेत्रात आबाळ झाली होती. निजामी राजवटीने लादलेली असंख्य बंधने व स्वातंत्र्याचा अभाव यामुळे हैद्राबाद राज्यातील हिंदू लोक हवालदिल झाले होते. शेवटच्या निजामाच्या इस्लामीकरणाच्या प्रवृत्तीमुळे समाज अस्वस्थ बनला होता. एकोणीसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात आर्य समाजाने हैद्राबाद राज्यात प्रवेश केला व तेथील हिंदुंच्यात लढाऊ वृत्ती निर्माण केली. प्रारंभापासून आर्य समाज निजामी राज्यातील हिंदूधर्म व संस्कृतीच्या संरक्षण, संवर्धनासाठी प्रयत्नशील होता. तेथील हिंदूंच्या सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्यासाठी आर्य समाज कार्यरत होता. त्याला कालानुरूप राजकीय रंगही धारण करावा लागला. हैद्राबाद मुक्ती संग्रामात आर्य समाज, हिंदू महासभा व हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस या संघटनांनी मोठे कार्य केले आहे.

' मराठवाड्यातील आर्य समाजाची चळवळ ' हा विषय मी संशोधनासाठी निवडला हा केवळ योगायोग होता. मराठवाड्यामध्ये नोकरीच्या निमित्ताने मी बराच काळ वास्तव्य केल्यामुळे मराठवाड्यातील बहुतेक ठिकाणे माझ्या पाहण्यात आली. तेव्हा ठिकठिकाणी आर्य समाजाचा प्रभाव अद्यापही असल्याचे जाणवले. तेव्हा मराठवाड्यात खेडोपाडी आर्य समाजाचा प्रसार कसा काय झाला हे जाणून घेण्याची माझ्या मनाला ओढ लागली. हैद्राबादच्या मुक्ती आंदोलनातही आर्य समाजाने उल्लेखनीय कार्य केले आहे हे समजल्यावर तर मला मराठवाड्यातील आर्य समाजाच्या चळवळीचा, कार्यांचा सांगोपांग अभ्यास करावा असे मला वाटू लागले. म्हणून आर्य समाजाचे मराठवाड्यात कार्य काय आहे हे जाणून घेण्याचा मी प्रयत्न सुरू केला. माझे गुरुवर्य प्रा. वेदकुमार वेदालंकार यांच्याशी मी आर्य समाजाच्या

कार्याबाबत सविस्तर चर्चा केली. कारण त्यांचे घराणे हे पूर्णत: आर्य समाजी आहे. त्यांनी आर्य समाजाच्या चळवळीबाबत मला बरीच माहिती कथन केली. एव्हांना मी माझ्या अभ्यासाच्या विषयाबद्दल निवडीबाबतचा मनाशी पक्का निर्णय केला. एम्.फिल्. पदवीसाठी `मराठवाड्यातील आर्य समाजाची चळवळ` याच विषयावर शोधप्रबंध लिहायचा मी निश्चय केला. माझे संशोधन मार्गदर्शक व शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागातील प्रपाठक डॉ.अरूण भोसले यांच्याशी मी चर्चा केली. त्यांनीही मला हा विषय निवडण्याबाबत उत्तेजन दिले. आर्य समाजाच्या चळवळीबाबत कोणी काही संशोधनात्मक कार्य केले आहे का ? असेल तर त्याचे स्वरूप काय आहे ? आपणास काय करावे लागेल ? याची शोधाशोध सुरू झाली. तेंव्हा इ.स. १९८४ च्या सोलापूर येथे झालेल्या महाराष्ट्र इतिहास परिषदेमध्ये डॉ. संजीव देसाई (मुंबई) यांनी `हैद्राबाद संस्थान व मराठवाड्यातील आर्य समाजाची चळवळ` हा शोधनिबंध सादर केल्याचे समजले. तो शोधनिबंध माझे मार्गदर्शक डॉ. अरूण भोसले यांनी मला मिळवून दिला. तो मी काळजीपूर्वक अभ्यासला. हैद्राबाद मुक्ती संग्रामाबाबत स्वामी रामानंद तीर्थ, वसंत पोतदार, श्री. अनंत भालेराव इत्यादींचे लिखाण वाचावयास मिळाले. मात्र त्यांनी मुक्ती लढयामध्ये स्टेट कॉंग्रेसच्याच कार्याला सर्वाधिक श्रेय दिले आहे. या संदर्भात डॉ.बी. एच. डेंगळे (नांदेड) यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामात मराठवाड्याचा वाटा या विषयावर मराठवाडा विद्यापीठास १९८६ मध्ये पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला प्रबंधही माझ्या वाचण्यात आला. त्यामध्ये त्यांनी हिंदू महासभा, आर्य समाज व हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस इ. लढयांचा उल्लेख केलेला आहे. त्याच बरोबर हैद्राबाद राज्यातील तत्कालीन चळवळींचाही समावेश त्यामध्ये आहे. परंतु हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या इतिहासात स्टेट कॉंग्रेसचे स्थान सर्वश्रेष्ठ असल्याचे त्यांच्या विवेचनातून प्रतित होते. वस्तुत: लढयाच्या अखेरच्या टप्प्यात आर्य समाज व स्टेट कॉंग्रसने एकत्र येऊन संयुक्तपणे झुंज दिली. तसेच स्टेट कॉंग्रेसमध्ये सहभागी झालेल्यातील बहुसंख्यांक आर्य समाजी होते. त्यामुळे हैद्राबाद मुक्ती लढयाची पार्श्वभूमी आर्य समाजाने

तयार केली होती हे कोणी नाकारू शकणार नाही. लातूरच्या डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांनी १९७८ च्या अमृतपुत्र त्रैमासिकामध्ये " हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये आर्य समाजाचे योगदान " हा लिहिलेला लेख आर्य समाजाच्या कार्यांचा व त्याशी संबंधित घटनांचा आढावा घेणारा व बरीचशी माहिती देणारा वाटला. मात्र आज पावेतो प्रस्तुत विषयावर संशोधनात्मक फारसे लिखान झाले नसल्याचे आढळते. या पार्श्वभूमीवर मी माझ्या संशोधन कार्यांचा प्रपंच थाटू लागलो. माहितगार लोकांच्या मुलाखतीसाठी मी निलंगा, औरंगाबाद, गुंजोटी, हैद्राबाद, उस्मानाबाद, धारूर, नळदुर्ग इ. अनेक ठिकाणी फिरलो. ब-याचशा आर्य गणांनी आपल्या कार्यासंबंधी कोणी तरी लिहावे व त्यास आपण सहकार्य करावे अशी भावना असल्याचे मला आढळले. तथापि प्रत्यक्षात अभ्यासास उपयुक्त ठरणारी तत्कालीन कागदपत्रे कोणा आर्य समाजाकडे फारशी मिळाली नाहीत हे खेदाने नमूद करावे लागत आहे. अर्थात त्याला तशी कारणेही होती. निजामी सरकारच्या दडपशाहीमुळे हे लोक स्वत:जवळ लेखी स्वरूपात कांही ठेवू शकले नाहीत, तर ब-याचवेळा सरकारी अधिका-यांनी त्यांच्याजवळची कागदपत्रे जप्त केली.

प्रस्तुत प्रबंधासाठी मला हैद्राबाद येथील आंध्र प्रदेश दप्तरखान्यात अनेक फायली मिळाल्या. आर्य समाजाबाबत अनेक फायली व कागदपत्रे तेथे उपलब्ध झाली. तर आर्य समाजाच्या कार्यांचा इतिवृत्तांत देणारे कांही अहवाल आर्य प्रतिनिधी सभा, सुलतान बाजार, हैद्राबाद येथे उपलब्ध झाले. पं. कृष्णदत्तजी आचार्य (हैद्राबाद) कडेही मला काही अहवाल मिळाले. तसेच वृत्तपत्रे, मुलाखती, नियतकालिके पत्रव्यवहार, आर्य समाज विषयक माहिती देणारी प्रकाशित साधने यांचा साधन म्हणून उपयोग प्रस्तुत प्रबंधाच्या लेखनासाठी केला आहे. प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही साधनांच्यावर आधारीत हा प्रबंध आहे.

" मराठवाड्यातील आर्य समाजाची चळवळ " या माझ्या शोधप्रबंधात मी इ.स. १८९१ पासून ते १९४८ पर्यन्तच्या मराठवाड्यातील आर्य समाजाच्या

कार्यांचा आढावा घेतलेला आहे. तो घेत असताना काही ठिकाणी हैद्राबाद मुक्ती संग्रामा नंतरच्याही कार्यांचा क्वचित ओझरता उल्लेख केला आहे. सध्याच्या मराठवाडयातील सात जिल्हामधील आर्य समाजाची चळवळ व कार्य यांचा हा एक अभ्यास आहे.

प्रस्तुत प्रबंधामध्ये पाच प्रकरणे पाडण्यात आली असून शेवटी समारोप करण्यात आला आहे. पहिल्या प्रकरणामध्ये मराठवाडयातील भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेण्यात आला आहे. तर दुस-या प्रकरणामध्ये तत्कालीन परिस्थितीमध्ये आर्य समाजाचा उदय मराठवाडयात कसा झाला व पुढे त्याचा प्रसार कसकसा होत गेला याची चर्चा करण्यात आली आहे. तिस-या प्रकरणामध्ये आर्य समाजाने सामाजिक व धार्मिक क्षेत्रामध्ये केलेले कार्य व त्यांनी समानतेच्या तत्वाचा केलेला प्रसार याचा उल्लेख केला आहे. चौथ्या प्रकरणात निजामकालीन शैक्षणिक स्थितीच्या कठीण काळात आर्य समाजाने कशा पध्दतीने शिक्षणाचा प्रसार केला व त्यासाठी उभारण्यात आलेली शैक्षणिक केंद्रे याबाबतची हकिकत मांडण्यात आली आहे. प्रकरण पाचमध्ये आर्य समाजाने हैद्राबादच्या मुक्ती संग्रामामध्ये केलेले कार्य, दिलेला लढा, पत्करावे लागलेले हौतात्म्य व आर्य समाजाचा त्यामध्ये असणारा वाटा याचा उल्लेख करण्यात आला आहे. एकंदरीत वरील पाच प्रकरणानंतर समारोपाच्या प्रकरणामध्ये तत्कालीन परिस्थितीत आर्य समाजास कार्य करीत असताना कोणत्या कठीण प्रसंगाना तोंड द्यावे लागले असेल शिवाय आर्य समाजाने आपले कार्य सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या माध्यमातून केलेल्या कार्यांचे प्रतिक होते. तर हैद्राबादच्या लढयात आर्य समाजाचा वाटा कसा महत्वाचा आहे. त्या संदर्भात कार्यकर्त्यांची त्यागी, कर्तृत्वशाली वृत्ती महत्वाची ठरते. आर्य समाजाने समानतेचा दिलेला मंत्र हा सर्व धर्म, जाती, समभाव करणारा आहे. आर्य समाजाची शिकवण ही राष्ट्रीय दर्जाची शिकवण होती असे म्हणावे लागेल.

अशा प्रकारे मी तयार केलेल्या या प्रबंधाचे वाचकांकडून व जिज्ञासू-कडून योग्य स्वागत होईल व दाद मिळेल असा विश्वास वाटतो.

नामदेव ज्ञानू कदम
(अभ्यासक)

## ऋ ण नि र्दे श

" मराठवाडयातील आर्य समाजाची चळवळ " हा विषय संशोधनासाठी निवडल्यापासून प्रस्तुत प्रबंध पूर्ण करेपर्यन्त ज्या अनेक व्यक्ती व संस्था यांचे मला सहकार्य, मार्गदर्शन आणि उत्तेजन लाभले त्या सर्वांचे अंत:करणपूर्वक आभार मानणे हे मी माझे आद्य कर्तव्य समजतो. कारण त्यांच्या सहकार्याशिवाय माझे संशोधन कार्य सिध्दीस गेले नसते याची मला जाणीव आहे. सर्वप्रथम मी माझे संशोधन मार्गदर्शक डॉ. अरूण भोसले यांचे कृतज्ञापूर्वक आभार मानतो. त्यांनी मला संशोधन विषयाची निवड व त्याचा अभ्यास याबाबत बहुमोल मार्गदर्शन केले आणि सतत उत्तेजन देऊन, सदैव सहकार्य केले. त्यांचा मी ऋणी आहे. तसेच इतिहास विभाग प्रमुख डॉ. बी.आर. कांबळे यांनीही वेळोवेळी मला जी प्रेरणा, मार्गदर्शन व सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो. मा सेक्रेटरी, विद्यापीठ अनुदान मंडळ, नवी दिल्ली यानी मला फॅकल्टी इम्प्रुव्हमेंट योजने अंतर्गत टिचर फेलोशिप दिली, तर मा.सेक्रेटरी, श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर यानी एम्. फिल्. साठी मला आवश्यक ती परवानगी व पगारी रजा दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. तुळजाभवानी महाविद्यालयात मला ज्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी लाभली ते प्राचार्यद्वय मा.श्री.पी.बी. चव्हाण व मा.श्री.यु.के. देशमुख यांनी मला ही बहुमोल संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. वरील सर्व संस्थांचे मी अंत:करणपूर्वक आभार मानतो.

हे काम करीत असतानाच अनेक व्यक्ती, संस्था व संघटना यानी केलेले सहकार्य हे अत्यंत मोलाचे ठरले. त्यामुळेच हे काम मी पूर्ण करू शकलो. त्यामध्ये मा. डायरेक्टर, आंध्र प्रदेश पुराभिलेखागार, तारानाका हैद्राबाद, मा. मंत्री, सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा, रामलीला मैदान, नवी दिल्ली, मा. मंत्री, आर्य प्रतिनिधी सभा, सुलतान बाजार, हैद्राबाद, मा. मंत्री, आर्य प्रतिनिधी सभा,

वाजेगांव, नांदेड, मा. सेक्रेटरी, दयानंद अँग्लो वैदिक महाविद्यालय, सोलापूर, मा. संचालक, सेंट्रल लायब्ररी, हैद्राबाद, मा. ग्रंथपाल व स्टाफ, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, मा. ग्रंथपाल, तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर, मा. ग्रंथपाल, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद, विजय वाचनालय, तुळजापूर, मा. ग्रंथपाल, दयानंद महाविद्यालय, सोलापूर इ. संस्थांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

तसेच प्रसिध्द इतिहास संशोधकद्वय सेतु माधवराव पगडी आणि स.मा. गर्गे यांनी मला पत्राद्वारे दिलेले मार्गदर्शन व प्रेरणा मोलाच्या ठरल्या. त्याबद्दल त्या दोघांचाही मी ऋणी आहे. इतिहास संशोधक डॉ. संजीव देसाई (मुंबई) यानी आर्य समाजविषयक आपला शोधनिबंध मला उपलब्ध करून दिला, तो मला अत्यंत उपयुक्त ठरला. त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो. माझे गुरू व भूतपूर्व प्राचार्य मा. बी.ए. बाबर (तासगांव) यानी मला माझ्या संशोधन कार्यास सातत्याने प्रोत्साहन दिले, त्याबद्दल त्यांचेही मी मन:पूर्वक आभार मानतो. त्याशिवाय प्रा. वेदकुमार वेदालंकार, पं.उत्तममुनी वानप्रस्थी, विष्णुकुमार वेदार्य, आर्यमुनीजी (उस्मानाबाद), अँडव्होकेट विजयकुमार वाघमारे (निलंगा), देवमुनी वानप्रस्थी (तुळजापूर), श्री. कृष्णाथराव जगताप (तुळजापूर), नंदलाल आर्य (जालना), प्रा. कुशलदेव शास्त्री (नांदेड), प्रा. रमेश ठाकूर (गुंजोटी) पं. नरदेव स्नेही, ज्ञानेंद्रस्वामी संतोषानंद (औरंगाबाद), पं. कृष्णदत्तजी, आचार्य खंडेराव कुलकर्णी, पं. वेदभूषण, क्रांतीकुमार कोरटकर (हैद्राबाद), प्रा. राजेंद्र जिज्ञासू, दयानंद महाविद्यालय, अबोहर (पंजाब), पं. प्रियदत्त शास्त्री, पानिपत (हरियाना), प्राचार्य सदा विजय आर्य (औराद शहाजनी), प्राचार्य देवदत्त तुंगार (रोहा), मुख्याध्यापक केशवराव होळीकर (उदगीर), डॉ. पी.व्ही. काटे (सेलू), डॉ.बी.एच. डेंगळे (नांदेड) वसंत पोतदार (आष्टा कासार), डॉ. बापुराव गुरव (तासगांव) इ. व्यक्तींनी माझ्या लेखन कार्यास उपयुक्त पुस्तके, कागदपत्रे व पत्राद्वारे तसेच प्रत्यक्ष

मुलाखतीत बहुमोल माहिती पुरवली. त्याबद्दल वरील सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. याशिवाय प्रा. पी.ए. कुलकर्णी, प्रा. बी.डी. जाधव, प्रा. एन.ए. शिंदे, प्रा. ए.डी. जाधव, प्रा. ए.पी. वडगणे, प्रा. जी.पी. मुलाणी, श्री. ढेंगसर, श्री. व्ही.एल. चव्हाण सर, प्रा. जी.एस. हिरेमठ (कोल्हापूर), प्रा. वाय.ए. डोके, प्रा. एस.जे. बारगीर, श्री. गायकवाडसाहेब (तुळजापूर) तसेच मुख्याध्यापक, मा. एन.आर. बदडे इ. नी मला माझ्या कामात वेळोवेळी सहकार्य केले. त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो. माझी पत्नी सौ.उषा कदम हीने ही मला या कामी मोलाची मदत केली. तसेच हा प्रबंध वेळेत विद्यापीठात सादर करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेऊन श्री. कवडे यांनी टंकलेखनाचे काम व्यवस्थित पूर्ण करून दिले. त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो. पुन:श्च सर्वांचे एकवार अंत:करणपूर्वक आभार मानतो.

(नामदेव ज्ञानू कदम)
अभ्यासक